नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २४४ Issue - 244 | वार शुक्रवार दि. २३ जानेवारी २०२६ Blow- Friday Date 23 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# दावोसमध्ये महाराष्ट्राचे ३० लाख कोटींचे सामंजस्य करार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




## महाराष्ट्रातील पत्रकारांशी व्हीसीच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांचा संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दावोस : दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने ३० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून, आणखी १० लाख कोटींच्या गुंतवणूक करारांची प्राथमिक बोलणी पूर्ण झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना दिली. यातून ४० लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे असेही त्यांनी सांगितले.

- **आणखी १० लाख कोटींच्या कराराची प्राथमिक बोलणी पूर्ण**
- **८३ टक्के करारांमध्ये थेट परकीय गुंतवणूक**
- **एकूण १८ देशांमधून महाराष्ट्रात गुंतवणूक**
- **४० लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट**
- **देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईनजीक**
- **मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमी विकसित करणार**

महाराष्ट्रातील पत्रकारांशी त्यांनी व्हीसीच्या माध्यमातून संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. या करारांपैकी ८३ टक्के करारांमध्ये थेट परकीय गुंतवणूक असून, एकूण १८ देशांमधून महाराष्ट्रात ही गुंतवणूक येते आहे. १६ टक्के गुंतवणूक ही परकीय तंत्रज्ञान भागिदारीत आहे. या १८ देशांमध्ये अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर, जपान, स्वित्झर्लंड, स्वीडन, नेदरलँड, नॉर्वे, इटली, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, युएई, स्पेन, कॅनडा, बेल्जियम इत्यादींचा समावेश आहे. औद्योगिक, सेवा, कृषी, तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक येते आहे. सामंजस्य करार प्रत्यक्षात परावर्तित होण्याचा दर हा ७५ टक्के आहे. गेल्या वर्षीचे करार हे ७५ टक्के प्रत्यक्षात आलेले आहेत, अशीही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ही गुंतवणूक ३ ते ७ वर्षांत परावर्तित होत असते, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एसबीजी, ब्रुकफिल्ड, आर्सेलर मित्तल, फिनमन ग्लोबल, इस्सार, स्कोडा ऑटो, फॉक्सवेगन, एसटीटी टेलिमीडिया, टाटा, अदानी, रिलायन्स, जेबीएल, कोकाकोला, बॉश, कॅपिटल लँड, आयर्न माऊंटेन अशा अनेक कंपन्यांशी हे करार झालेले आहेत. काही समूह हे भारतीय असले तरी त्यांची सुमारे १६५ देशांमध्ये गुंतवणूक आहे. क्वांटम काम्प्युटिंग, एआय, जीसीसी, डेटा सेंटर्स, आरोग्य, अन्न प्रक्रिया, ग्रीन स्टील, नगरविकास, जहाजनिर्माण, फिनटेक, लॉजिस्टीक, डिजिटल इन्फ्रा अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक आली आहे.

कोकण, एमएमआरमध्ये २२ टक्के, विदर्भात १३ टक्के, तर ५० टक्के गुंतवणूक राज्याच्या इतर भागात आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, धुळे, अहिल्यानगर अशा सर्व भागात ५० हजार कोटी, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये ५५,००० कोटी रुपये, कोकण प्रदेशात ३,५०,००० कोटी, नागपूर आणि विदर्भात २,७०,००० कोटी अशी प्रमुख आकडेवारी आहे. जायका, जेबीआयसी, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, स्टँडफोर्ड युनिव्हर्सिटीतील स्टँडफोर्ड बायोडिझाईन असे अनेक संस्थात्मक करार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

**देशातील पहिली इनोव्हेशन सिटी**

टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करणार आहोत, येणाऱ्या ६ ते ८ महिन्यात याचे सविस्तर नियोजन होईल. ही संकल्पना गेल्याच वर्षी दावोसमध्ये आली होती. टाटा सन्सचे एन. चंद्रशेखरन यांच्यासोबत याबाबत चर्चा झाली. यासाठी १ लाख कोटींहून अधिक गुंतवणूक टाटा करणार आहेत. इतरही अनेक देशातील गुंतवणूकदार यासाठी गुंतवणूक करणार आहेत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमीचा विकास!

मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमी तयार करणार असून मुंबईतील पाणी, हवा याचे प्रश्न यातून सोडविण्यात येतील. सर्व प्रकारच्या वेस्टवर प्रक्रिया झाली पाहिजे, हा प्रयत्न यातून करण्यात येणार आहे. पुढे हीच संकल्पना सर्व मोठ्या शहरांमध्ये नेण्यात येईल. मुंबईत पुढच्या २ ते ३ वर्षात हा परिणाम आपण दाखवू शकू. रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा याच दावोसमध्ये करण्यात आली. या ग्रोथ सेंटरमुळे एक बिझनेस डिस्ट्रीक्ट तयार होईल. यात १ लाख कोटींची गुंतवणूक कालच आली आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

झिम्बांब्वे परराष्ट्र व्यवहार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार मंत्री प्रो. ॲमोन मुरविरा यांनी महाराष्ट्राच्या सौरऊर्जा क्षेत्रातील प्रगतीची एका परिषदेत मुक्तकंठाने प्रशंसा केली. या परिषदेला मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी उपस्थित होते.

ॲलन टुरिंग इन्स्टियूट मिशन संचालक ॲडम सोबे यांची मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट घेत त्यांच्याशी वाहतूक क्षेत्राबाबत चर्चा केली. कार्बन उत्सर्जन कमी करुन स्वच्छ आणि भविष्याच्या गरजा भागवता येतील, अशा उपाययोजनांबाबत ही चर्चा झाली.

अरुप समूहाच्या अध्यक्ष हिल्डे टोन यांच्याशी नगरविकासाच्या विविध पैलूंवर, इंडो-इटालियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे ॲलेसेन्ड्रो ग्युईलानी यांच्यासोबत परस्पर सहकार्य वाढवण्यावर यावेळी चर्चा झाली.

# भीषण अपघात! लष्कराचं वाहन २०० फूट दरीत कोसळलं; १० जवानांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




**१० जखमी, अनेकांची प्रकृती गंभीर**


श्रीनगर : एका दुर्घटनेमध्ये १० भारतीय जवानांना प्राण गमवावे लागले आहे. लष्कराचे वाहन तब्बल २०० फूट दरीत कोसळले. अनेक जवानांची प्रकृती गंभीर आहे.

लष्कराचे एक वाहन रस्त्यावरून घसरून खोल दरीत कोसळले. या भीषण अपघातात १० जवानांचा मृत्यू झाला असून, इतर जवान जखमी झाले आहेत. जम्मू-काश्मीरमधील डोडा येथे गुरुवारी हा दुर्दैवी अपघात झाला. स्थानिक नागरिक आणि बचाव पथकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले.

सैन्य अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी एक लष्करी वाहन २० जवानांना घेऊन उंच भागातील चौकीकडे जात होते. डोडा येथील भादरवाह-चंबा आंतरराज्यीय रस्त्यावर खानी टॉपजवळ हे बुलेटप्रूफ वाहन रस्त्यावरून घसरले. हे वाहन सुमारे २०० फूट खोल दरीत कोसळले. या अपघातात १० जवानांचा जागीच मृत्यू झाला. इतर जवान गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच, लष्कर आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने तात्काळ बचावकार्य सुरू केले. स्थानिक नागरिकही मदतकार्यात सहभागी झाले.

बचावकार्यात १० जवानांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. (पान २ वर...)

# प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा जयघोष निनादणार




**गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' चित्ररथ सज्ज**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापनदिनानिमित्त राजधानीतील कर्तव्यपथावर होणाऱ्या भव्य पथसंचलनासाठी महाराष्ट्राचा चित्ररथ सज्ज झाला असून, यंदा राज्याच्या वतीने 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला जाणार आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर यंदाचा सोहळा विशेष ठरणार आहे. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीत संचलनात सहभागी होणारा महाराष्ट्राचा हा चित्ररथ राज्याची प्रदीर्घ परंपरा आणि वाढत्या आर्थिक सामर्थ्याचे दर्शन अवघ्या जगाला घडवेल. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून ज्या सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, तिच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण या चित्ररथात करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा शाश्वत रोजगार आणि त्यातून विणली गेलेली (पान २ वर...)

**कुणाला लॉटरी लागणार? उत्सुकता शिगेला**

**महिलांसाठी ५० टक्के आरक्षण**

# मुंबईसह २९ महापालिकांच्या महापौरपदासाठी आरक्षणाची सोडत जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महापालिकेतील सत्तास्थापनेतील पहिला आणि महत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या महापौरपदाच्या आरक्षणासाठी आज, गुरुवारी मंत्रालयात सोडत काढण्यात आली आहे. महापौरपदाच्या पहिल्या अडीच वर्षांच्या कालावधीसाठी ही सोडत आहे. आरक्षणात स्पष्टता आल्यानंतर महापालिकेतील सत्तास्थापनेच्या घडामोडींना वेग आला आहे. सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या मुंबई महापौरपदाच्या सोडतीकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं.

मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान होऊन दुसऱ्या दिवशी निकाल जाहीर झाले. तिथपासून मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगरच्या महापौरपदासाठी भाजप आणि शिवसेना यांच्यामध्ये रस्सीखेच सुरू आहे. याशिवाय भिवंडी, चंद्रपूर येथेही महापौरपद पटकवण्यावरून काँग्रेस, शिवसेना (उबाठा) पक्ष यांच्यात चढाओढ लागली आहे. यातच आता महापालिकांच्या चर्चेंडौंशी निघाली आहे.

नगरविकास खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळयांच्या अध्यक्षतेखाली आज गुरुवारी सकाळी १२ वाजता मंत्रालयातील परिषद सभागृहात महापौरपदाची आरक्षण सोडत निघाली आहे. या सोडतीत कोणत्या महापालिकेत कोणत्या प्रवर्गातील महापौरपद आरक्षित झाले आणि कोणत्या महापालिकेत खुल्या प्रवर्गातील महापौर असेल, हे स्पष्ट झालं आहे. नगरविकास विभागात महापौर आरक्षण सोडतीची जोरात तयारी सुरू होती. नव्याने स्थापन केलेल्या जालना आणि इचलकरंजी महापालिका वगळता अन्य महापालिकांमध्ये कार्यकाळ संपण्याआधी शेवटचे महापौरपदाचे आरक्षण कधी लागू झाले आणि त्याची मुदत कधी संपली, याची माहिती गोळा करण्यात आली आहे.

महापौरपदाचे आरक्षण चक्राकार पद्धतीने काढलं गेलं आहे. त्यामुळे याआधीचे संबंधित महापालिकेचे आरक्षण बाजूला ठेवण्यात आलं आहे. आरक्षणासाठी २०११च्या जनगणनेचा आधार घेण्यात आला आहे, अशी माहिती नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी काल बुधवारी दिली. सुरुवातीला अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यानंतर नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. यात महिलांसाठी ५० टक्के आरक्षण होतं, असेही या अधिकाऱ्याने सांगितलं.

दरम्यान, आज सोडत जाहीर झाल्यानंतर आता, महापालिकांमध्ये महापौरपदी कुणाची वर्णी लागेल? हे पाहणं देखील महत्त्वाचं असणार आहे.



**महापालिकानिहाय आरक्षणाचा प्रवर्ग**

मुंबई - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण (महिला) आरक्षण

नवी मुंबई - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण (महिला) आरक्षण

ठाणे - अनुसूचित जाती प्रवर्ग (SC)

मिरा-भाईंदर - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण (महिला) आरक्षण

कल्याण-डोंबिवली - अनुसूचित जमाती प्रवर्ग (ST)

उल्हासनगर - ओबीसी प्रवर्ग (OBC)

वसई-विरार - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण

भिवंडी-निजामपूर - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण (महिला) आरक्षण

पनवेल - ओबीसी प्रवर्ग (OBC)

नाशिक - खुला प्रवर्ग (Open)- सर्वसाधारण (महिला) आरक्षण

अहिल्यानगर - ओबीसी प्रवर्ग (OBC) - (महिला) साठी राखीव

मालेगाव - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण (महिला) आरक्षण

जळगाव - ओबीसी प्रवर्ग (OBC) - (महिला) साठी राखीव

धुळे- खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण (महिला) आरक्षण

नागपूर - खुला प्रवर्ग (Open)- सर्वसाधारण

अकोला - ओबीसी प्रवर्ग (OBC) - (महिला)साठी राखीव

अमरावती - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण

चंद्रपूर - ओबीसी प्रवर्ग (OBC) - (महिला) साठी राखीव

पुणे - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण (महिला) आरक्षण

पिंपरी-चिंचवड - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण (महिला) आरक्षण

सांगली - खुला प्रवर्ग (Open)- सर्वसाधारण

कोल्हापूर - ओबीसी प्रवर्ग (OBC)

इचलकरंजी - ओबीसी प्रवर्ग (OBC)

सोलापूर - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण

छत्रपती संभाजीनगर - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण

परभणी - खुला प्रवर्ग (Open)- सर्वसाधारण

जालना - अनुसूचित जाती प्रवर्ग (SC) - (महिला)साठी राखीव

लातूर - अनुसूचित जाती प्रवर्ग (SC) - (महिला)साठी राखीव

नांदेड - खुला प्रवर्ग (Open) - सर्वसाधारण (महिला) आरक्षण

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### गुंतवणूक व करार

दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने ३० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून, आणखी १० लाख कोटींच्या गुंतवणूक करारांची प्राथमिक बोलणी पूर्ण झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना दिली. यातून ४० लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे. या करारांपैकी ८३ टक्के करारांमध्ये थेट परकीय गुंतवणूक असून, एकूण १८ देशांमधून महाराष्ट्रात ही गुंतवणूक येते आहे. १६ टक्के गुंतवणूक ही परकीय तंत्रज्ञान भागिदारीत आहे. या १८ देशांमध्ये अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर, जपान, स्वित्झर्लंड, स्वीडन, नेदरलँड, नॉर्वे, इटली, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, युएई, स्पेन, कॅनडा, बेल्जियम इत्यादींचा समावेश आहे. औद्योगिक, सेवा, कृषी, तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक येते आहे. सामंजस्य करार प्रत्यक्षात परावर्तित होण्याचा दर हा ७५ टक्के आहे. गेल्या वर्षीचे करार हे ७५ टक्के प्रत्यक्षात आलेले आहेत. ही गुंतवणूक ३ ते ७ वर्षांत परावर्तित होत असते, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एसबीजी, ब्रुकफिल्ड, आर्सेलर मित्तल, फिनमन ग्लोबल, इस्सार, स्कोडा ऑटो, फॉक्सवेगन, एसटीटी टेलिमीडिया, टाटा, अदानी, रिलायन्स, जेबीएल, कोकाकोला, बॉश, कॅपिटल लँड, आयर्न माऊंटेन अशा अनेक कंपन्यांशी हे करार झालेले आहेत. काही समूह हे भारतीय असले तरी त्यांची सुमारे १६५ देशांमध्ये गुंतवणूक आहे. क्वांटम काम्प्युटिंग, एआय, जीसीसी, डेटा सेंटर्स, आरोग्य, अन्न प्रक्रिया, ग्रीन स्टील, नगरविकास, जहाजनिर्माण, फिनटेक, लॉजिस्टीक, डिजिटल इन्फ्रा अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक आली आहे. कोकण, एमएमआरमध्ये २२ टक्के, विदर्भात १३ टक्के, तर ५० टक्के गुंतवणूक राज्याच्या इतर भागात आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, धुळे, अहिल्यानगर अशा सर्व भागात ५० हजार कोटी, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये ५५,००० कोटी रुपये, कोकण प्रदेशात ३,५०,००० कोटी, नागपूर आणि विदर्भात २,७०,००० कोटी अशी प्रमुख आकडेवारी आहे. जायका, जेबीआयसी, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, स्टँडफोर्ड युनिव्हर्सिटीतील स्टँडफोर्ड बायोडिझाईन असे अनेक संस्थात्मक करार करण्यात आले आहे. टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करणार आहोत, येणाऱ्या ६ ते ८ महिन्यात याचे सविस्तर नियोजन होईल. ही संकल्पना गेल्याच वर्षी दावोसमध्ये आली होती. टाटा सन्सचे एन. चंद्रशेखरन यांच्यासोबत याबाबत चर्चा झाली. यासाठी १ लाख कोटींहून अधिक गुंतवणूक टाटा करणार आहेत. इतरही अनेक देशातील गुंतवणूकदार यासाठी गुंतवणूक करणार आहेत.

## 'ग्राहक राजा' च्या घोषणेतून हक्कजागृती पर्यंतचा प्रवास : राष्ट्रीय ग्राहक दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय लोकशाहीची रचना तीन खांबांवर उभी आहे ते म्हणजे विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका. मात्र आधुनिक काळात एक चौथा, तितकाच महत्त्वाचा खांब पुढे आला आहे, तो म्हणजे ग्राहक. उत्पादन, सेवा, बाजारपेठ आणि अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असलेला ग्राहक हा आज केवळ खरेदीदार राहिलेला नाही, तर तो हक्क-जाणीव असलेला, प्रश्न विचारणारा आणि अन्यायाविरुद्ध उभा राहणारा नागरिक बनू लागला आहे. हीच जाणीव दृढ करण्यासाठी दरवर्षी २४ डिसेंबर हा 'राष्ट्रीय ग्राहक दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक कार्यक्रमांचा किंवा भाषणांचा नसून, तो आहे ग्राहक हक्क, जबाबदाऱ्या आणि बाजारातील नैतिकतेचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस. ग्राहक राजा आहे ही घोषणा ऐकायला आकर्षक वाटते; पण खरा प्रश्न असा आहे की आजचा ग्राहक खरोखरच राजा आहे का, की जाहिरातींच्या, ऑफर्सच्या आणि फसव्या आश्वासनांच्या जाळ्यात अडकलेला एक असहाय घटक?

२४ डिसेंबर १९८६ रोजी भारतात ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. याच ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा केला जातो. या कायद्याने भारतीय बाजारपेठेत एक मूलभूत बदल घडवून आणला. याआधी ग्राहक हा शोषण सहन करणारा, तक्रार करूनही न्याय न मिळणारा घटक होता. व्यापारी, उत्पादक आणि सेवा पुरवठादार यांच्यापुढे ग्राहकाची ताकद नगण्य मानली जात होती. ग्राहक संरक्षण कायद्याने प्रथमच ग्राहकाला कायदेशीर ओळख, हक्क आणि न्यायासाठी स्वतंत्र यंत्रणा दिली. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण मंचांच्या माध्यमातून 'न्याय सहज, जलद आणि कमी खर्चात' मिळावा, हा या कायद्याचा मूलमंत्र होता. त्यामुळे राष्ट्रीय ग्राहक दिन हा केवळ एक दिनविशेष न राहता, ग्राहक चळवळीचा मैलाचा दगड ठरला.

ग्राहक ही संकल्पना आज फार व्यापक झाली आहे. वस्तू खरेदी करणारा, सेवा घेणारा, ऑनलाईन व्यवहार करणारा, बँकिंग, विमा, आरोग्य, शिक्षण, दूरसंचार सेवा वापरणारा, हे सारे ग्राहकच आहेत. म्हणजेच, जन्मापासून मृत्यूपर्यंत माणूस ग्राहकच असतो. त्यामुळे ग्राहक हक्कांचा प्रश्न हा केवळ बाजारपेठेपुरता मर्यादित न राहता, तो थेट नागरिकांच्या जीवनमानाशी जोडलेला आहे. आज ग्राहक शोषणाची रूपे बदलली आहेत. पूर्वी मोजमापात फसवणूक, भेसळ, निकृष्ट दर्जा हे प्रकार प्रामुख्याने दिसत होते. आज त्यासोबतच डिजिटल फसवणूक, ऑनलाईन स्कॅम, लपविलेले शुल्क, चुकीच्या अटी, डेटाचा गैरवापर अशी नवी संकटे उभी राहिली आहेत.

ग्राहक संरक्षण कायद्यानुसार ग्राहकाला काही मूलभूत हक्क दिले आहेत. जसा सुरक्षिततेचा हक्क, माहिती मिळण्याचा हक्क, निवडीचा हक्क, ऐकून घेण्याचा हक्क, तक्रार निवारणाचा हक्क आणि ग्राहक शिक्षणाचा हक्क. हे हक्क केवळ कागदावर मर्यादित राहू नयेत, तर ते व्यवहारात उतरवणे हीच राष्ट्रीय ग्राहक दिनाची खरी गरज आहे. कारण हक्क माहिती नसतील, तर ते वापरले जाणार



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde @gmail.com

नाहीत; आणि वापरले गेले नाहीत, तर ते निष्प्रभ ठरतात.

भारतात ग्राहक राजा आहे ही संकल्पना मोठ्या अभिमानाने मांडली जाते. जाहिराती, बॅनर, सरकारी मोहिमा यांतून हा संदेश दिला जातो. मात्र प्रत्यक्षात अनेक वेळा ग्राहक हा राजा नसून, प्रयोगाचा उंदीर ठरतो. आकर्षक जाहिरातींमागील अटी लपवल्या जातात, स्वस्ताच्या नावाखाली निकृष्ट सेवा दिली जाते आणि तक्रार केल्यावर 'कस्टमर केअर'च्या फेऱ्यांत ग्राहक अडकतो. ग्राहक राजा बनण्यासाठी केवळ घोषणा पुरेशी नाही; त्यासाठी जाणीव, संघटितपणा आणि धैर्य आवश्यक आहे. अन्याय सहन न करता तक्रार करणे, पुरावे जपणे, मंचाचा वापर करणे, ही खरी राजेशाही आहे. आजचा ग्राहक डिजिटल झाला आहे. ऑनलाईन खरेदी, ॲप्स, कॅशलेस व्यवहार, ई-कॉमर्स यामुळे सोय वाढली आहे, पण धोकेही तितकेच वाढले आहेत. बनावट वेबसाईट्स, फेक रिव्ह्यूज, डेटा चोरी, ओटीपी फसवणूक या सगळ्यांचा सामना ग्राहकाला करावा लागतो. अशा काळात राष्ट्रीय ग्राहक दिन हा डिजिटल साक्षरतेचा आणि सतर्कतेचा संदेश देणारा दिवस ठरायला हवा. 'स्वस्त', 'ऑफर', 'मर्यादित वेळ' या शब्दांमागे न धावता विचारपूर्वक निर्णय घेणे, हीच आजच्या ग्राहकाची खरी गरज आहे.

हक्कांसोबत जबाबदाऱ्याही येतात. ग्राहकाने बिल घेणे, अटी वाचणे, फसवणूक लक्षात आल्यास तक्रार करणे, आणि चुकीच्या व्यवहाराला पाठिंबा न देणे ही त्याची सामाजिक जबाबदारी आहे. ग्राहक जागरूक नसेल, तर बाजारपेठ बेजबाबदार होते. राष्ट्रीय ग्राहक दिन हा केवळ व्यापाऱ्यांना इशारा देणारा नसून, ग्राहकांनाही आत्मपरीक्षण करायला लावणारा दिवस आहे. आपण स्वतः किती जागरूक आहोत, हा खरा प्रश्न आहे. ग्राहक चळवळ ही लोकशाहीला बळ देणारी चळवळ आहे. कारण ती सामान्य माणसाला न्याय मिळवून देते. आज अनेक प्रकरणांत ग्राहक मंचांनी मोठ्या कंपन्यांना दंड ठोठावले आहेत. यामुळे बाजारपेठेत जबाबदारी आणि पारदर्शकता वाढते. मात्र अजूनही अनेक ग्रामीण, गरीब, अशिक्षित ग्राहक या यंत्रणेपासून दूर आहेत. राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ग्राहक शिक्षण, जनजागृती आणि सुलभ न्यायव्यवस्था यावर अधिक भर देणे ही काळाची गरज आहे.

राष्ट्रीय ग्राहक दिन हा केवळ एक औपचारिक दिनविशेष नसून, तो आहे ग्राहकाच्या स्वाभिमानाचा आणि हक्कांचा उत्सव. 'ग्राहक राजा आहे' ही घोषणा तेव्हाच खरी ठरेल, जेव्हा ग्राहक स्वतः जागरूक, सजग आणि निर्भय बनेल. बाजारपेठ मोठी झाली आहे, व्यवहार वेगवान झाले आहेत, पण माणूस केंद्रस्थानी राहिला पाहिजे. ग्राहकाचे शोषण थांबवणे म्हणजेच लोकशाहीचे मूल्य जपणे होय. म्हणून राष्ट्रीय ग्राहक दिन हा केवळ स्मरणाचा नव्हे, तर संकल्पाचा दिवस ठरायला हवा. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि आपल्या हक्कांसाठी लढण्याचा. कारण जागरूक ग्राहक हाच सक्षम अर्थव्यवस्थेचा आणि न्याय्य समाजाचा खरा पाया आहे. राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त प्रत्येक ग्राहक जागरूक, सजग आणि निर्भय व्हावा, हक्कांची जाणीव केवळ कागदापुरती न राहता व्यवहारात उतरावी, बाजारपेठेत प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि जबाबदारी वाढावी आणि 'ग्राहक राजा आहे' ही संकल्पना खऱ्या अर्थाने साकार व्हावी, याच मनापासून शुभेच्छा !

## कळंब येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात बोलींचा जागर कार्यक्रम उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : भाषा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या सहकार्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात बोलींचा जागर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या विशेष कार्यक्रमाला शरद यादव (सहायक संचालक, भाषा संचालनालय, मंत्रालय, मुंबई)) यांचे महत्वपूर्ण मार्गदर्शन लाभले ते म्हणाले कि, मराठी भाषा प्राचीन असून तिच्या इतिहासा सोबत भौगोलिक क्षेत्र सामाजिक व सांस्कृतिक परंपरा यांचाही विकास होतो. भाषा ही संस्कृती रुजविण्याचे काम करते, पुढील पिढीस हा वारसा जतन करण्याचे सामाजिक भान आणून देण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा ठरतो. शासकीय आणि विद्यापीठ संलग्न महाविद्यालयामध्ये हा कार्यक्रम घेण्यात आला. त्यामधून मराठी भाषा प्रगल्भ असून तिचे संवर्धन करणे काळाची गरज आहे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त महाराष्ट्र शासनाने ३६ जिल्ह्यात बोलींचा जागर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. याचाच एक भाग म्हणून ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात जिल्हास्तरीय हा कार्यक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भव्य ग्रंथदिंडी व शोभायात्रेच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या परिसरात बोली जगवा..! बोली वाचवा...!! भाषा वाचवा..! संस्कृती टिकवा...!! मी मराठी...! माझी मराठी...!!या जयघोषात काढण्यात आली. यामध्ये शिवप्रसाद शर्मा व राज सरवदे यांनी महाराष्ट्रीयन लोककला लावणी, वाघ्या मुरळी, वेशभूषा व शाहीर बंडू खराटे यांनी बोलीभाषेवर पोवाडा सादर केला.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने पूज्य ज्ञानदेव मोहेकर गुरुजींच्या प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. उद्घाटन ज्ञान प्रसार मंडळ संस्थेचे सचिव




डॉ.अशोकराव मोहेकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. यावेळी उदगीरी बोली अभ्यासक प्रसाद कुमठेकर, दखनी बोली मिर्झा बेग, डी.के.शेख तसेच बोली कलावंत अनंत कदम, हनुमंत म्हेत्रे यांनी उदगिरी बोलीचे महत्व आपल्या मार्गदर्शनातून पटवून दिले.

याप्रसंगी शासनाच्या वतीने डॉ.आनंद गांगण (अनुवादक, मंत्रालय) यांनी मराठवाडा, विदर्भ, खानदेश व पश्चिम महाराष्ट्र म्हणजेच चांदा ते बांद्यापर्यंत भाषा संवर्धनाची ही जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. त्यासाठी निश्चितच शासनाची सहकार्याची भूमिका असल्याचे विशद केले.

व्यासपीठावर महेश लगड (अनुवादक, मंत्रालय), दिलीप लादे, (वरीष्ठ लिपिक, मंत्रालय) संचालक डॉ. डी.एस.जाधव, रमेश बोर्डेकर, डॉ. संजय कांबळे (अधिसभा सदस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हेमंत भगवान उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांना बोलीभाषा विषयक, आदर्श मराठी व्याकरण लेखन सारखे ग्रंथभेट व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन ग्रंथपाल डॉ.अनिल फाटक व कर्मचारी यांच्या सहकार्याने करण्यात आले. यावेळी विद्याभवन हायस्कूल, सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तसेच राहुल देशमुख, ह.भ.प. महादेव महाराज आडसूळ, सोपान पवार, महादेव गपाट,संजय मोरे, डॉ.डी.एन.चिंते, डॉ.के.डबलु. पावडे, प्रा.बालाजी वाघमारे आदींनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरविंद शिंदे, संतोष मोरे, उमेश साळुंखे, आदित्य मडके, संदीप सूर्यवंशी व भारत शेळके यांनी सहकार्य केले. प्रास्ताविक डॉ.दादाराव गुंडरे, सूत्रसंचालन बोलींचा जागरकार्यक्रम समन्वयक प्रा.डॉ.दीपक सूर्यवंशी तर आभार उपप्राचार्य डॉ. के. डी. जाधव यांनी मांडले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. यावेळी विद्यार्थी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व भाषाप्रेमी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भीषण अपघात! लष्कराचं वाहन २०० फूट दरीत कोसळलं; १० जवानांचा मृत्यू

(पान १ वरून..) जखमी जवानांना बाहेर काढण्यात आले असून, त्यापैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. तीन गंभीर जखमी जवानांना हेलिकॉप्टरने उधमपुर येथील कमांड हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले आहे. तिथे त्यांना विशेष उपचार दिले जात आहेत. लष्कराने या घटनेबाबत एक निवेदन जारी केले आहे. त्यानुसार या अपघाताची चौकशी सुरू केली आहे. जखमी जवानांना तात्काळ उपचार देण्यात आला आहे. अपघातात मृत्यू झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांना माहिती देण्यात आली आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की वाहन रस्त्यावरून अज्ञात कारणाने घसरले आणि दरीत कोसळले.

जम्मू काश्मीर येथील डोडा जिल्हातील स्थिती संवेदशील आहे. तेथे दहशतवादी घटना वाढत असून सैन्यदलाकडून ऑपरेशन करण्यात येत आहे. डोडा जिल्ह्यात दहशतवादी असण्याची शक्यता आहे तेथील डोंगराळ आणि जगलात ते लपले असू शकतात. रिपोर्टनुसार डोडा आणि आजूबाजूच्या परिसरात ३०-३५ पाकिस्तानी वंशाचे दहशतवादी सक्रिय असू शकतात.

## प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा जयघोष निनादणार

(पान १ वरून..) आर्थिक साखळी या चित्ररथाच्या केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२५ पासून सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली असून, या उत्सवामुळे केवळ सांस्कृतिकच नव्हे, तर पर्यावरणीय आणि आर्थिक आत्मनिर्भरतेसही कशी चालना मिळते, हे या चित्ररथातून ठळकपणे मांडण्यात आले आहे.

कसा असेल चित्ररथ?

महाराष्ट्राच्या या चित्ररथाची रचना अत्यंत कलात्मक आणि डोळ्यांचे पारणे फेडणारी आहे. चित्ररथाच्या अग्रभागी महाराष्ट्राच्या ऊर्जेचे प्रतीक असलेला एक भव्य ढोल आणि तो वाजवणारी पारंपारिक वेशभूषेतील महिला राज्याच्या प्रबळ स्त्रीशक्तीचे दर्शन घडवेल. चित्ररथाच्या मध्यभागात गणपतीची देखणी मूर्ती साकारणारा मूर्तिकार आणि विसर्जनासाठी निघालेला गणेशभक्त दर्शवण्यात आला आहे. चित्ररथाच्या शेवटच्या भागात महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक मंदिराची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली असून, इतर सांस्कृतिक बाबींचेही बारकाव्यांसह दर्शन घडवण्यात आले आहे. चित्ररथाच्या दोन्ही बाजूस पारंपारिक नऊवारी साडी परिधान केलेल्या महिलांचे लेझीम पथक असेल. यंदाचा हा सोहळा 'जनभागीदारी'वर आधारित असून, संचलनानंतर २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर आयोजित होणाऱ्या 'भारत पर्व'मध्ये देखील देशवासियांना महाराष्ट्राच्या या सांस्कृतिक समृद्धीचा आणि आत्मनिर्भरतेच्या प्रवासाचा आनंद घेता येणार आहे.

## भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी जिल्ह्यांमध्ये पालकमंत्री व मंत्री करणार ध्वजवंदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २१ जानेवारी २०२६ रोजी ध्वजवंदनाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८.३० ते १० या दरम्यान ध्वजवंदनाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्ध शासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजवंदन समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८.३० च्या पूर्वी किंवा १० वाजेनंतर करावा, असे राजशिष्टाचार विभागामार्फत परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

मुंबई येथील प्रमुख समारंभात मुख्यमंत्री यांच्या हस्ते शिवाजी पार्क, दादर मुंबई येथे ध्वजवंदन व समारंभपूर्वक संचलन कार्यक्रम होईल. विभागीय आणि जिल्हा स्तरावर पुढे दर्शविल्याप्रमाणे पालकमंत्री / मंत्री अथवा राज्यमंत्री ध्वजवंदन करतील.

ठाणे- उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे; पुणे-उपमुख्यमंत्री अजित आशाताई अनंतराव पवार; नागपूर- चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे; अहिल्यानगर- राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे पाटील; सांगली- चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील; नाशिक- गिरीश गीता दत्तात्रय महाजन; पालघर- गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक; जळगाव- गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील; अमरावती- दादाजी रेश्माबाई दगडू भुसे; यवतमाळ- संजय प्रमिला दुलीचंद राठोड; मुंबई शहर- मंगलप्रभात प्रेम कंवर गुमनमल लोढा; रत्नागिरी- उदय स्वरुपा रवींद्र सामंत; धुळे- जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल; जालना- श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे; नांदेड- अतुल लीलावती मोरेश्वर सावे; चंद्रपूर- डॉ.अशोक जनाबाई रामाजी वूईके; सातारा- शंभुराज विजयादेवी शिवाजीराव देसाई; मुंबई (उपनगर)- ड.आशिष मिनल बाबाजी शेलार, वाशिम- दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे; लातूर- शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले; सोलापूर- जयकुमार कमल भगवानराव गोरे; हिंगोली- नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ; भंडारा- संजय सुशिला वामन सावकारे, छत्रपती संभाजीनगर- संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट, धाराशिव- प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक, रायगड- भरत विठाबाई मारुती गोगावले; बुलढाणा- मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील); सिंधुदुर्ग- नितेश निलम नारायण राणे; अकोला- आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर; बीड- बाबासाहेब शांताबाई मोहनराव पाटील; कोल्हापूर- प्रकाश सुशीला आनंदराव आबिटकर; गडचिरोली- ड. आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल; वर्धा- डॉ.पंकज कांचन राजेश भोयर; परभणी- मेघना दीपक साकोरे-बोर्डीकर; गोंदिया- इंद्रनील अनिता मनोहर नाईक आणि नंदुरबार- योगेश ज्योती रामदास कदम.

राष्ट्रध्वजवंदन करणारे पालकमंत्री / मंत्री अथवा राज्यमंत्री काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रम स्थळी उपस्थित राहू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी तसेच इतर विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी अनुक्रमे संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी राष्ट्रध्वजवंदन करतील. संबंधित प्रांत अधिकारी व तहसीलदार हे अनुक्रमे जिल्हा उपविभागीय व तालुका मुख्यालयी ध्वजवंदन समारंभाच्या ठिकाणी शासकीय कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान स्वीकारतील.

राज्यात वरील दिवशी सर्व शासकीय व सार्वजनिक इमारतींवर, किल्ल्यांवर तसेच जिल्ह्यांमध्ये ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी राष्ट्रध्वज उभारण्यात यावेत. राष्ट्रध्वजाला वंदन करताना राष्ट्रगीत म्हणण्यात यावे अथवा वाजविण्यात यावे आणि त्यानंतर सावधान स्थितीत येऊन राज्यगीत वाजविण्यात यावे, असेही कळविण्यात आले आहे.

राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक एफएलजी-१०९१/३०, दिनांक २ मार्च १९९१ तसेच क्रमांक एफएलजी-१०९१(२)/३०, दिनांक ५ डिसेंबर १९९१ तसेच क्रमांक एफएलजी १०९८/ ध्वजसंहिता/३०, दिनांक ११ मार्च १९९८ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. याप्रसंगी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित रहावे. तसेच उत्सव अथवा औपचारिक प्रसंगी परिधान करावयाचा राष्ट्रीय पोशाख प्रजासत्ताक दिन समारंभप्रसंगी उपस्थित राहणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी व व्यक्तींनी परिधान करावा. स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांच्या पत्नींना व आई-वडील यांना तसेच आणिबाणीच्या कालावधीमध्ये कारावास भोगलेल्या व्यक्ती यांना समारंभास निमंत्रित करावे. अधिकाधिक नागरिकांना हा सोहळा घरबसल्या पाहता यावा, यासाठी वेबसाईटद्वारे थेट प्रक्षेपण करण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना या परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# माघ यात्रा: दिंडीधारकांनी प्लॉट्सची मागणी नोंदवावी : प्रांताधिकारी सचिन इथापे

## दि. २५ जानेवारी पासून प्लॉट नोंदणीस होणार प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघ यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. २९ जानेवारी २०२६ रोजी साजरा होत असून, यात्रा कालावधी २३ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी २०२६ असा आहे. या यात्रेत येणाऱ्या शेकडो दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. दि. जानेवारी पासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात आली आहे. संबधितांनी भक्तीसागर येथे प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.

माघ यात्रेला येणाऱ्या दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात.या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते.

भक्तीसागर (६५ एकर) येथे भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे (मो.क्र.९७६७२४८२१०), तसेच ग्राम महसूल अधिकारी प्रमोद खंडागळे (मो.क्र. ९६५७२९०४०३)) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या बुलढाणा जिल्हा संघटकपदी पत्रकार कैलास आंधळे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :बुलढाणा जिल्ह्यातील ग्राहकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी ,कार्यरत असलेली भारत सरकार नोंदणीकृत भारत सरकार माणुसकी सोशल फाउंडेशन संचालित ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या बुलढाणा जिल्हा संघटक पदी मेरा बुद्रुकचे पत्रकार कैलास आंधळे यांची नव्याने नियुक्ती झालेली आहे.ही नियुक्ती ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे तसेच राष्ट्रीय



सचिव अविनाश झोटिंग यांनी केली आहे.तसेच विदर्भाध्यक्ष सचिन खंडारे,विदर्भ कार्याध्यक्ष सुनील अंभोरे ,बुलढाणा जिल्हा अध्यक्ष डॉ.शालिग्राम चव्हाण,डॉ. गंगाराम उबाळे यांच्या मार्गदर्शनातून ही नियुक्ती झालेली आहे.बुलढाणा जिल्हा संघटक पदी मेरा बुद्रुक चे पत्रकार कैलास आंधळे यांचा सामाजिक,शैक्षणिक,राजकीय तसेच विविध क्षेत्रात दांडगा अनुभव असून.सध्या ते पत्रकार म्हणून काम पाहत आहेत.त्यामुळे त्यांच्या या कामाचा नक्कीच जनतेच्या तसेच ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी फार मोठी मदत व फायदा होणार आहे.बुलढाणा जिल्ह्यातील ग्राहकांना न्याय देण्याचे काम माझ्या हातून घडत आहे. व माझी निवड बुलढाणा जिल्हा संघटक पदी केल्याबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे तसेच राष्ट्रीय सचिव विदर्भ अध्यक्ष व बुलढाणा जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ पदाधिकारी यांचे आभार त्यांनी मानले आहे.चांगल्या प्रकारचे ग्राहकांच्या समस्येचे निवारण करण्यासाठी कटिबद्ध आहे ,अशी त्यांनी ग्वाही दिलेली आहे.

त्यांच्या या ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती जिल्हा संघटक पदी जिल्हा संघटक पदी निवडीमुळे जिल्ह्यासह, चिखली तालुक्यातुन तसेच सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



# शंकरराव रामचंद्र माळवदे यांची सातारा नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सातारा येथील आपल्या समाजाचे अभ्यास व्यक्तिमत्व स्वातंत्र नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष शंकरराव रामचंद्र माळवदे यांची सातारा नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवक पदी नियुक्ती झाली.

ही नियुक्ती श्रीमंत खासदार उदयनराजे भोसले व सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या कृपाशीर्वादाने झाले आहे.

त्यांच्या पुढील कार्यासाठी नामदेव शिंपी समाजाच्या वतीने शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

# जिल्हास्त्तरीय माध्यम प्रमाणीकरण समितीमार्फत निवडणूक प्रचार साहित्याचे प्रमाणीकरण करणे आवश्यक : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ११ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेस सुरूवात झाली आहे. या निवडणुकीत सहभागी होणाऱ्या सर्व उमेदवारांनी प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारित करण्यापूर्वी त्या जाहिरातींचे प्रमाणीकरण जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीकडून करून घेणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्पष्ट केले आहे.

**अधिसूचना व नियम**

महाराष्ट्र शासनाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भातील सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे.

यामध्ये खालील माध्यमांचा समावेश आहे :

– दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केबल वाहिन्या

– यूट्यूब वाहिन्या, केबल नेटवर्क

– आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या

– चित्रपटगृहातील जाहिराती

– सार्वजनिक ठिकाणचे दृकश्राव्य फलक (ऑडिओ-व्हिज्युअल डिस्प्ले)

– ई-वृत्तपत्रे

– बल्क एसएमएस, व्हाइस एसएमएस

– समाजमाध्यमे (सोशल मीडिया)

– संकेतस्थळे

समितीची रचना

निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समितीची दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी स्थापना करण्यात आली आहे.

– पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी

– उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख

– संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी

– संबंधित तहसीलदार

हे सदस्य म्हणून तर जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के सदस्य सचिव म्हणून कार्यरत राहतील.

अर्ज प्रक्रिया

प्रस्तावित जाहिरात प्रसारित किंवा प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी किमान पाच दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्व प्रमाणनासाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

– अर्जासोबत जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत जोडावी.

– राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

– अर्जाचा विहित नमुना महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेसोबत उपलब्ध आहे. तसेच जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणान व संनियंत्रण समिती, जिल्हा माहिती कार्यालय, प्रशासकीय इमारत, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे उपलब्ध होईल.

**आवाहन:-**

जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, उमेदवारांनी जाहिरातींचे प्रमाणीकरण करूनच प्रचार करावा. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आणि आचारसंहितेचे पालन करण्यासाठी ही प्रक्रिया अत्यावश्यक आहे.

# वाढदिवसानिमित्त अनाथाश्रम येथे मुलांना कपडे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : भीमा कोरेगाव शौर्य दिन तसेच युवा भिमसेना संस्थापक अध्यक्ष पंकज भाऊ काटे यांच्या वाढदिवसानिमित्त २०/०१/२०२६ रोजी युवा भिमसेना युवा जिल्हाध्यक्ष शेखर कांबळे महिला जिल्हाध्यक्ष उमाताई आदमाने वैजनाथ भाऊ कांबळे यांच्या वतीने युवा भिमसेना महाराष्ट्र राज्य संपर्क कार्यालय लातूर येथे खुशीग्राम अनाथ आश्रम येथे अनाथ मुलांना कपडे वाटप अन्नदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष – युवा उद्योजक सरपंच मार्शल भाऊ माने, विशेष उपस्थिती – युवा




भिमसेना सं महासचिव आश्रुबा कांबळे, सरकार पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संतोष अण्णा कांबळे, प्रदेशाध्यक्ष कुमार भाऊ कांबळे, बीड जिल्हाध्यक्ष अजय भाऊ सरवदे, अमोल चापे, कार्यक्रमाचे मार्गदर्शक – युवा भिमसेना प्रवक्ते सोफी भाई सय्यद, युवा भिमसेनेचे सर्व पदाधिकारी सं. सचिव राहुल लांडगे, सं. महबूब सय्यद, संपर्कप्रमुख पंकज गायकवाड, मराठवाडा अध्यक्ष अमोल जागते, जिल्हा संपर्कप्रमुख निलेश मस्के, वि. से. जिल्हाध्यक्ष भूषण मांदळे, जिल्हा उपाध्यक्ष दादा डोळसे, मुरुड शहराध्यक्ष स्वप्निल कदम, शहराध्यक्ष अजय कांबळे, पुणे शहराध्यक्ष मयूर भंडारे, युवा जिल्हा उपाध्यक्ष रोहन रायबोळे सुमित डोळसे शहर संघटक मिथुन बनसोडे विशाल भोसले रेनापुर तालुका अध्यक्ष अमोल चक्रे, अँड. सुनील मस्के, शहर कार्याध्यक्ष वि. से. जिल्हा उपाध्यक्ष सिद्धार्थ गवळी, वि. से. शहराध्यक्ष गणेश पोटभरे, औसा तालुका उपाध्यक्ष निखिल लोखंडे, रतन रायबोळे, अनिकेत वाघमारे, करण सोनटक्के तरी सर्व पदाधिकारी असंख्य भीमसैनिकांच्या कार्यकर्त्यांच्या मित्र कंपनीच्या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीमध्ये वाढदिवस पार पडला यावेळी सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेचे ०५ तर पंचायत समितीचे १२ अर्ज नामंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील ८ जिल्हा परिषद व १६ पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी विक्रमी अर्ज दाखल झाले होते. जिल्हा परिषदेसाठी १५८ अर्जापैकी ५ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या ८ जागेसाठी १५३ अर्ज वैध ठरले आहेत. तर पंचायत समितीच्या १६ जागेसाठी २६७ अर्ज दाखल झाले होते. या अर्जांपैकी २५५ वैध ठरले असून १२ अर्ज नामंजूर ठरविण्यात आले आहेत. अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन लंगुटे यांनी दिली.


> **पंढरपूर तालुक्यात पंचायत समितीसाठी २५५ व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी १५३ अर्ज मंजूर, छाननी पूर्ण**

पंढरपूर तालुक्यात होणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया गुरुवारी पंढरपूर येथील तहसील कार्यालयात पूर्ण झाली.जिल्हा परिषद भाळवणी गटातून २ अर्ज नामंजूर ठरले असून १३ अर्ज वैध ठरले आहेत. तर टाकळी गटातून २ अर्ज नामंजूर ठरले असून २५ अर्ज वैध ठरले आहेत. तसेच कासेगाव गटातून १ अर्ज नामंजूर ठरला असून २३ अर्ज वैध ठरले आहेत. मात्र, करकंब १५, भोसे १३, रोपळे १९, वाखरी २६ सर्व अर्ज वैध ठरले आहेत. पंढरपूर पंचायत समिती गणात सुस्ते गणात ४ अर्ज नामंजूर ठरले आहेत. वाखरी गणातून १, भाळवणी २, पळशी २, खर्डी २, कासेगाव १ असे १२ अर्ज नामंजूर झाले आहेत. तर ऊर्वरित गणातील सर्वच्या सर्व अर्ज वैध ठरले आहेत.

**स्थानिक पातळीवर राजकीय समीकरणे बदलणार**

# पंढरपुरात कल्याण काळे गटाला खिंडार....

# एकीकडे काळे यांचा पक्षप्रवेश असताना दुसरीकडे त्यांचेच कार्यकर्ते आमदार अभिजीत पाटील यांच्या गटात केला प्रवेश



> **कल्याणराव काळे यांनी सतत दुसऱ्या पक्षामध्ये प्रवेश करून दुसऱ्यांदा फेरी सुरू केली आहे त्यालाच कंटाळून त्यांच्यातीलच ज्येष्ठ मंडळींनी आमच्यासोबत काम करण्याचे ठरवले असून त्यांचा जाहीर प्रवेश देखील झाला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे स्थानिक पातळीवर नवी ताकद आणि ऊर्जा मिळाली आहे. विचारधारेचं अनुकरण करून जनतेच्या विकासासाठी नवीन जेष्ठाचं आर्शीवाद आणि तरूण सहकाऱ्यांचं मोलाचं योगदान मिळेल,असा विश्वास आहे.**
>
> **– आमदार अभिजीत पाटील.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सध्या आज सगळीकडेच स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचे सगळीकडेच पडघम वाजले आहे. सध्या पंढरपूर तालुक्यातील ८जिल्हा परिषद गट तसेच १६ पंचायत समिती गणासाठी निवडणुका लागल्या आहेत तरी आमदार अभिजीत पाटील यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र करून उमेदवारी अर्ज अधिकृतपणे उमेदवार उभे केले आहेत.

सध्या आमदार अभिजीत पाटील हे सर्व ताकतीनिशीय पंढरपूर व माढा मध्ये पंचायत समिती व जिल्हा परिषद साठी सर्व उमेदवार उभे केले आहेत. सध्या वाखरी जिल्हा परिषद गटातून काळेनी अर्ज दाखल केला आहे. त्याच अनुषंगाने आज कल्याणराव काळे व समाधान काळे यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला असता त्याच कल्याणराव काळे गटातीलच माजी पंचायत समिती सदस्य, वाडीकुरोली माजी सरपंच चंद्रकांत पाटील, नंदकुमार पाटील यांनी आमदार अभिजीत पाटील यांच्या गटांमध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी विठ्ठल कारखान्याचे माजी संचालक सूर्यकांत बागल, विठ्ठल कारखान्याचे संचालक धनंजय काळे, साहेबराव नागणे, शेतकरी संघटनेचे तानाजी बागल, रणजीत बागल, धनंजय बागल, सत्यवान नाईकनवरे, उपसरपंच नागेश घोडके यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

# वाशी तालुक्यातील पहिले देहदान : सामाजिक जाणिवेचा आदर्श ठरले कै. मनीषा निरगुडे यांचे कार्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशी प्रतिनिधी/दिपक क्षिरसागर : वाशी तालुक्यातील पहिले देहदान आणि धाराशिव जिल्ह्यातील सहावे देहदान मंगळवार दि. २१ रोजी घडून आले असून, ही घटना समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेतून आणि धाराशिव जिल्हा संप्रदाय यांच्या माध्यमातून वाशी तालुक्यातील पिंपळगाव (लिंगी) येथील कै. मनीषा पंडित निरगुडे (वय ४६) यांनी देहदानाचा संकल्प प्रत्यक्षात साकारला. अल्पशा आजाराने त्यांचे दुःखद निधन झाले. निधनापूर्वी काही दिवस त्यांनी देहदान करण्याची स्पष्ट इच्छा व्यक्त केली होती.

त्यांच्या इच्छेचा सन्मान राखत पती पंडित निरगुडे, मुलगी तसेच इतर नातेवाईकांच्या संमतीने त्यांचे पार्थिव धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात देहदान करण्यात आले. या देहदानामुळे वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी मोलाची मदत होणार आहे.निधनाची माहिती मिळताच संप्रदायचे वाशी येथील माजी जिल्हाध्यक्ष विजय भारती, तालुकाध्यक्ष बंडू पवार, सचिव शिवाजी सारुक यांनी तातडीने पिंपळगाव गाठले. तेथील कार्यकर्ते पंडित सुकाळे, विलास कोल्हे, सुधीर निरगुडे, त्रिशाला निरगुडे व अनिता जगताप यांच्या सहकार्याने धाराशिव जिल्हा कमिटी व शासकीय मेडिकल कॉलेजशी संपर्क साधून देहदानाची प्रक्रिया अत्यंत शिस्तबद्धरीत्या पार पाडली.

या प्रसंगी संप्रदायचे जिल्हाध्यक्ष संतोष केसकर, जिल्हा सचिव कानडे, युवा प्रमुख लक्ष्मी माने तसेच जिल्हा समितीचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

कै. मनीषा निरगुडे यांचे देहदान हे समाजासाठी दीपस्तंभ ठरले असून, अंधश्रद्धा, रूढी-परंपरांना छेद देत मानवतेसाठी देहदानाचा आदर्श त्यांनी उभा केला आहे. त्यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत असून, वाशी तालुक्यात सामाजिक परिवर्तनाची नवी चळवळ सुरू झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# वाढत्या ब्लास्टिंगमुळे बासलेगावातील घरांना गेले तडे

## अक्कलकोट तालुक्यातील प्रकार ; सूरत ते चेन्नई महामार्गाच्या कामासाठी कंपनीकडून नियमबाह्य अवैधरित्या लावला जातोय सुरुंग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरालगत बासलेगाव रस्त्यावरील कोहिनूर मंगल कार्यालय जवळ सूरत ते चेन्नई महामार्गाचे काम सुरू आहे. रस्ता बनविण्यासाठी संबंधित कंपनीकडून नियमबाह्य अवैधरित्या बोर गाडीच्या सहाय्याने सुरुंग लावून मोठ मोठे ब्लास्टींग केले जात आहे. या वाढत्या ब्लास्टींगमुळे येथील अनेक घरांना मोठे तडे गेले आहेत, तर अनेक घरांची पडझड होण्याची शक्यता आहे. आणि अनेक कुटुंबांच्या बोअरवेल मधील पाण्याची पातळी कमी झाली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून ब्लास्टींग सुरू असताना, अनेक मोटारसायकलस्वार बासलेगाव कडे जात असताना किंवा अक्कलकोट कडे येत असताना त्यांच्या बाजूलाच ५ ते १० किलोचा भला मोठा दगड येऊन पडला. सुदैवाने तो मोटारसायकलस्वार सहपत्नीक थोडक्यात बचावले.

गेल्या दोन महिन्यांपासून ब्लास्टींगचे काम सुरू असून, कोहिनूर मंगल कार्यालय परिसरातील वसाहत मधील नागरिक व महिलांसह वयोवृद्ध व्यक्ती आणि चिमुकली मुले जीव मुठीत घेऊन जीवन जगत आहेत. दररोज ब्लास्टींग सुरु असताना सकाळी पासून ते संध्याकाळी पर्यंत वसाहत लगत व बासलेगाव रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दगड पडले. संबंधित रस्ता ठेकेदारांच्या सहकारी इंजिनिअर व कामगारांनी संगनमताने हे अवैध ब्लास्टींग मर्यादा पेक्षा जास्त उडविण्याचे कामास सुरुवात केली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

**गेल्या वर्षभरापासून सूरत ते चेन्नई रस्ता कामकाज सुरू असून मात्र एक – दोन महिन्यांपासून दिवस व रात्र वसाहत परिसरात अवैध ब्लास्टींग उडविण्याचे कामास सुरुवात केली आहे. याकडे तहसील प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. तरी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन अवैध ब्लास्टींग उडविण्याचे कामास पायबंद घालण्यासाठी सूचना द्यावी, अन्यथा या परिसरातील श्री वटवृक्ष गणेश मंडळाच्या वतीने नागरिकांनी आंदोलन करणार असल्याचे सांगितले.**

**माझी शेती सूरत ते चेन्नई महामार्गाच्या दोन्ही बाजूला आहे. या रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग घेत असल्याने धुळीमुळे पीकांचे नुकसान होत आहे. तसेच गेल्या वर्षभरापासून दोन एकर शेतजमीन मध्ये पावसाचे पाणी थांबले आहे. यामुळे सदरची दोन एकर शेतजमीन नापीक झाले आहे. यामुळे सुमारे दोन लाख रुपये किंमतीची नुकसान झाले आहे. सदर नुकसान कंपनीने भरून द्यावे, याबाबत कंपनीकडे वारंवार मागणी केली आहे. मात्र माझ्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. नुकसान भरपाई दिली नाही तर याबाबत निवेदन देऊन उपोषणासाठी बसणार आहे.**

**– अहमदपाशा पिरजादे (शेतकरी, नागनहळ्ळी)**



तर परिसरातील मंगल कार्यालयाचे संचालक उरुजपाशा पिरजादे, नागराज कुंभार, प्रशांत गुरव, सुनील गोरे, सिध्दाराम पाटील, इनायत शेख, रमेश शिंदे, दिगंबर साळुंखे, गुरप्पा कुंभार, सुनील आळंद, अविनाश कोरे, विजयकुमार मलंग, विकास जकापुरे, संगमेश्वर स्वामी, सचिन डिग्गे, शशिकांत कुंभार, करेप्पा रोळ्ळी, अलका दसले, उज्वला फडतरे, विजयालक्ष्मी कुंभार यांच्या घरांना तडे गेले आहेत. सूरत ते चेन्नई सुपर रस्ता काम करणाऱ्या कंपनीकडून नुकसान भरपाई मिळावी, या मागणीसाठी येथील वसाहत मधील नागरिक व महिलांनी अनेकवेळा कंपनीसह शासन लोकप्रतिनिधींना तोंडी सांगितले आहे, आता निवेदने देण्याच्या तयारीत आहेत. विशेष म्हणजे या अवैध ब्लास्टींग उडविण्याचे बाबतीत पोलिस निरीक्षक दीपक भिताडे यांनी सुद्धा या वसाहत मधील नागरिकांच्या तोंडी तक्रारीची दखल घेऊन ठेकेदारांच्या मुनिमास सूचना दिल्या आहेत. तरी सुद्धा त्या सूचना ची पायमल्ली केली जात आहे. म्हणून तहसीलदार व लोकप्रतिनिधी यांनी संबंधित ठेकेदारास ब्लास्टींग उडविण्याऐवजी पर्यायी मार्ग निवडण्याची सूचना द्यावी, अशी वाढती मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# भाजप संपणार नाही : पालकमंत्री गोरे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यामध्ये पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे नरेंद्रभाई सुरू आहे. या पार्श्वभूमीवर काही राजकीय नेते भाजपला संपवण्याची भाषा करीत आहेत. भाजपला संपवणारा अद्याप जन्माला यायचा आहे. असे सडेतोड उत्तर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. यावेळी आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, चेअरमन कल्याण काळे, समाधान काळे, उपस्थित होते. पंढरपूर तालुक्यातील विठ्ठल कारखाने नेते समाधान काळे

यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. या पाशी घूमर वाडकरोली येथे आयुद करण्यात आलेल्या कार्यक्रमाला सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. आमदार प्रशांत परिचारक, चेअरमन कल्याण काळे व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

जिल्हा परिषद अध्यक्ष भाजपचाच होणार, पालकमंत्री जयकुमार गोरे असे म्हणाले. सोलापूर जिल्ह्यात भाजपचे चांगले काम आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत सर्व भाजपचे उमेदवार विजयी होतील त्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्ष भाजपचाच होणार, त्यामुळे विकास कामाला निधी कमी पडू दिला जाणार नाही. अशी ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

सभेला प्रचंड गर्दी होती,

पालकमंत्री जयकुमार गोरे यांची पहिल्यांदाच जाहीर सभा झाली व या सभेला मोठ्या प्रमाणात मतदार व नागरिक व शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. पालकमंत्री गोरे यांनी, चांगले भाषण करून उपस्थित यांचे मने जिंकली.

# खरोसा जिल्हा परीषद गटातुन कॉंग्रेसचे सचिन सुभाष पाटील निवडणुक लढणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव

मा.मंत्री सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांच्या तालमीतला पैलवान सचिन पाटील खरोसा गटातुन जिल्हा परीषद निवडणुक रिंगणात ,

औसा तालुक्यातील खरोसा जिल्हा परीषद गटातुन देशमुखांच्या मर्जीतला उमेदवार मनुन कॉंग्रेस पक्षाचे अधिक्रत जिल्हा परीषद उमेदवार सचिन सुभाषराव पाटील यांनी गेल्या कित्येक वर्षापासून सक्रिय राजकारणात आपला सहभाग नोंदवत एक निष्ठेने पक्ष वाढीसाठी केलेले कार्य जनसेवेच्या जोरावर कॉंग्रेस पक्षात मंगरूळ गावचे मा. उपसरपंच औसा युवक कॉंग्रेस तालुका अध्यक्ष ,महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी,मंगरुळ

सोसायटीचे संचालक , पाच वर्ष यशस्वी श्री संत शिरोमनी मारुती महाराज सह.साखर कारखाना संचालक व संत शिरोमनी मारुती महाराज कारखान्याचे विद्यमान व्हॉ चेअरमन अशा अनेक पदावर सचिन पाटील यांनी काम केल असुन ,आत्तापर्यंत केलेल्या कामाच्या जोरावर व एकनिष्ठेवर आज खरोसा जिल्हा परीषद निवडणुक लढवण्याची संधी कॉंग्रेस पक्षाने सचिन पाटील यांना दीली असुन ,सचिन पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगीतले की मी खरोसा जिल्हा परीषद गटातील गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सदैव प्रयत्नशिल असणार असुन खरोसा जिल्हा परीषद गटातील रस्ते ,नाले ,गटार ,आरोग्य ,

शिक्षणासह महिला सक्षमीकरणासाठी मला कॉंग्रेस पक्षांनी उमेदवारी दीली असुन पक्षाने दीलेल्या संधिच मी माझ्या सहकार्यांना सोबत घेउन निवडणुक लढउन निवडणुक जिकंण्याचा माझा संकल्प असल्याचे सचिन पाटील यांनी सांगीतले ,खरोसा

जिल्हा परीषद गटासाठी कॉंग्रेसचे



अधिक्रत उमेदवार सचिन सुभाष पाटील यांची खरोसा पंचायत समिती साठी सौ. शितल विष्णु फावडे व कारला पंचायत समिती मधुन प्रविन हरिदास काळे हे अधिक्रत उमेदवारी दाखल केली असुन

आमचे नेते सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमुख ,आ .अमित देशमुख मा.आ धिरजभैया देशमुख कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष अभयदादा साळुंके,व प्रदेशचे श्रीशैल्य उटगे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही ज्या पद्धतीने लातुर महानगर पालीकेवर कॉंग्रेसची एकहाती सत्ता आनली ,तशीच एकहाती हाती सत्ता आम्ही स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परीषद व पंचायत समिती वर कॉंग्रेसची सत्ता आनन्यासाठी जीवाच राण करु अस सचिन पाटील यांनी यावेळी सांगीतले ,....

कॉंग्रेस नेते शेषेराव पाटील ,सुग्रीव लोंढे , कॉंग्रेस तालुकाध्यक्ष किरण बाबळसुरे ,युवक कॉंग्रेस तालुकाध्यक्ष संजय लोंढे ,कार्याध्यक्ष बाळासाहेब सांगवे ,लायक शेख ,अतुल कदम ,अमीर पटेल ,प्रशांत पाटील अक्षय खरपडे,अंगद बिराजदार ,विष्णु फावडे ,गजेन्द्र शेळके .विशाल करदुरे ,एकनाथ शिंदे,राजाराम जाधव ,डॉ गोळे ,राजु पारुडकर ,प्रभात काळे ,प्रविन काळे ,शिवाजी शींदे,आविनाश पाटील ,खरोसा सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी उमेदवारी बद्धल अभिनंदन केले ,

# कळंब येथे २३ ते २६ जानेवारीला भव्य किसान मित्र कृषी प्रदर्शन; वर्ग मित्रांचा सामाजिक उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : कळंब येथील सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या फ्रेंड्स फॉरएव्हर फाउंडेशनच्या वतीने दि. २३, २४, २५ व २६ जानेवारी २०२६ रोजी शहरातील तालुका क्रीडासंकुल मैदानावर भव्य किसान मित्र कृषी प्रदर्शन कळंब २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनाचे हे दुसरे वर्ष असून गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी या प्रदर्शनामध्ये शेतीचे लाईव्ह शो ठेवण्यात आले आहेत. यात दुग्धपरिषद ऊस परिषद महिला परिषद मृदा परिषद अशा वेगवेगळ्या क्षेत्राची मेजवानी उपलब्ध होणार आहे.

हे प्रदर्शन केवळ कृषी प्रदर्शन नसून शेतकरी, महिला, युवक, पशुपालक व कृषी उद्योजकांसाठी ज्ञान, तंत्रज्ञान व प्रेरणेचे व्यासपीठ ठरणार आहे.

या कृषी प्रदर्शनाची सुरुवात दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता शहरातील मुख्य मार्गावर भव्य कृषी दिंडीने होणार आहे.कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता स्वागताध्यक्ष धाराशिव कळंब मतदारसंघाचे आ. श्री. कैलास (दादा) घाडगे पाटील व विभागीय कृषी सहसंचालक महेश तीर्थकर यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या कार्यक्रमास कृषीभूषण पांडुरंग आवाड, जिल्हा कृषी अधीक्षक राजकुमार मोरे,नगराध्यक्षा सुनंदाताई कापसे, उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे, तहसीलदार हेमंत ढोकले, कृषी अधिकारी

फ्रेंड्स फॉरएव्हर फाउंडेशन
2026 किसान मित्र
कृषी प्रदर्शन,कळंब

**"शेतीसाठी, संघर्षातुन समृध्दीकडे...."**

भागवत सरडे, मुख्याधिकारी मंजुषा गुरमे आदी मान्यवर उपस्थित राहतील.

**दुपारी दुग्ध परिषद (३ ते ५ )**

***विषय :* संतुलित पशुखाद्याचे दुग्ध व्यवसायातील महत्त्व व पर्यावरणपूरक गोठा पद्धती**

*प्रमुख व्याख्याते : डॉ. मनोजकुमार आवरे (इखत्र, पुणे) डॉ. अतुल मुंडे (धाराशिव)

दिवस दुसरा - शनिवार, २४ जानेवारी २०२६

**मृदा परिषद व भव्य अश्व प्रदर्शन– मृदा परिषद (११ते १)** अध्यक्ष :डॉ. सचिन सूर्यवंशी विषय : मृदा व जलसंधारण, मार्गदर्शक : डॉ. भगवान अरबाड विषय : जैविक शेती व पुनरुज्जीवन, सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत दुर्मिळ देशी घोड्यांचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

सत्र २(३ ते ५) :- अध्यक्ष :* डॉ. प्रविण पतंगे *विषय :* मृदासंधारणामध्ये जनावरांचे योगदान मार्गदर्शक : श्री. भागवत सरडे - ओल्या दुष्काळानंतर नैसर्गिक शेतीची गरज *रविवार, २५ जानेवारी २०२६ महिला परिषद ( ११ ते १ ) अध्यक्ष :मा. सौ. आरती वाकुरे *विषय :* शेतीमधील उद्योग - महिलांसाठी सुवर्णसंधी, मार्गदर्शन : पर्याय संस्थेचे व्यवस्थापक श्री. विलास (बापू) गोडगे यांचे महिलांसाठी सूक्ष्म रोजगार योजना, कॅनरा बँकेचे व्यवस्थापक श्री. प्रेसंजित गिरबिडे यांचे बँकांच्या महिलासाठी योजना या विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे.

दुसऱ्या सत्र दुपारी ३ ते ५ या कालावधीत मत्स्य विभागाच्या सहा. आयुक्त तेजस्विनी कराळे यांचे शेत तळ्यातील मत्स्यपालन, प्राध्यापिका वर्षा मरवाळीकर यांचे महिलांसाठी शेतीपूरक जोड व्यवसाय तर सुनंदा खराटे यांचे एकल महिला सक्षमीकरण या विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे.

पाककला, रांगोळी व पेपर/ फ्लॉवर बुके स्पर्धा (३ ते ५ )

सायंकाळी ७ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम

सुप्रसिद्ध आख्यानकार शाहिर विठ्ठल शेलार व चमूचा गाथा हिंदवी स्वराज्याची हा पोवाड्याचा कार्यक्रम संपन्न होईल.

दिवस चौथा - सोमवार, २६ जानेवारी २०२६ ऊस परिषद ( ११ ते ४ )

*अध्यक्ष :* मा. श्री. कृषिरत्न बी.बी.ठोंबरे *विषय :* भविष्यातील ऊस शेती व ऊस उद्योगाचे भविष्य *मार्गदर्शन : वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट चे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ .सुनील दळवी यांचे वसंत ऊर्जा जैव संजीवकाचे महत्व व ऊस शेती श्री. विश्वनाथ (आण्णा) तोडकर - ऊस शेतीचे अर्थकारण व महिलांचा सहभाग डॉ. महादेव पोवार - विद्राव्य खतांचे ऊस शेतीतील नियोजन या विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे.

कळंब तालुक्यासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी, महिला बचतगटांनी, युवकांनी व कृषी उद्योजकांनी या चार दिवसीय भव्य कृषी महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन फ्रेंड्स फॉरएव्हर फाउंडेशनचे राहुल कवडे, डॉ अभिजीत लोंढे, गोपाळ उबाळे, परमेश्वर मोरे प्रा जगदीश गवळी, उदय खंडागळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**प्रवासी संघटनांची मुख्य यात्री परिवहन प्रबंधक व वरिष्ठ परिचलन प्रबंधक यांच्याशी महत्त्वपूर्ण चर्चा**

# लोकल प्रवाशांच्या प्रश्नांवर रेल्वे प्रशासनाशी थेट भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

रेल्वे प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी लोकल प्रवाशांना दैनंदिन प्रवासात भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत रेल्वे प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली आहे . मुख्य यात्री परिवहन प्रबंधक (Cheef Passengers Transprotetion Maneger) डॉ.मिलिंद हिरवे तसेच वरिष्ठ परिचालन प्रबंधक (Sr.DOM²) अनंत शर्मा यांच्यासोबत झालेल्या या बैठकीत लोकल सेवेत सुधारणा करण्यासंदर्भात महत्त्वाचे मुद्दे मांडण्यात आले.

कसारा आणि कर्जत मार्गावर दररोज लोकल गाड्या अर्धा-अर्धा तास उशिरा धावत असल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. कार्यालयीन वेळा,विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वेळापत्रक तसेच व्यापारी, व्यवहार यावर त्याचा गंभीर परिणाम होत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले.रखडलेले प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर ताण येत असून त्याचा थेट फटका प्रवाशांना बसत असल्याचेही संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट करण्यात आले.यावेळी मेल एक्सप्रेस गाड्यांना अनावश्यक प्राधान्य न देता लोकल गाड्या सुरळीत आणि वेळेत चालविण्यावर भर देण्याची मागणी रेल्वे प्रवासी संघटनांनी केली.लोकल ही सामान्य नागरिकांची जीवनवाहिनी असून तिचे वेळापत्रक विस्कळीत झाल्यास संपूर्ण शहराच्या कामकाजावर परिणाम होतो,असे मत उपस्थित पदाधिकाऱ्यांनी मांडले. तसेच प्लॅटफॉर्म व्यवस्थापन,सिग्नलिंग प्रणाली,वेळापत्रकातील समन्वय आणि प्रवाशांच्या सुरक्षेच्या मुद्द्यांवरही चर्चा झाली.या बैठकीला महासंघाच्या अध्यक्षा लता आरगडे, कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष राजेश घनघाव, महासंघाचे सचिव जितेंद्र विशे,ठाणे रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष नंदकुमार देशमुख,कल्याण-कसारा पॅसेंजर असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश धनगर ,सल्लागार शैलेश राऊत तसेच प्रसिद्धी प्रमुख महेश तारमळे,ज्ञ३ चे शहाड स्थानक प्रतिनिधी आनंद ढोणे आदी मान्यवर उपस्थित होते.

रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांच्या समस्या गांभीर्याने ऐकून घेण्यात आल्या असून, टप्प्याटप्प्याने सुधारणा करण्याचे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले आहे. रखडलेल्या प्रकल्पांचा आढावा घेऊन कामाला गती देणे, लोकल सेवांचे नियोजन अधिक शिस्तबद्ध करणे तसेच प्रवाशांना होणारा त्रास कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याबाबत सकारात्मक भूमिका प्रशासनाने दर्शविली. या चर्चेमुळे प्रवाशांच्या प्रश्नांना अधिकृत व्यासपीठावर वाचा फुटली असून, लवकरच प्रत्यक्ष सुधारणा



दिसून येतील, अशी अपेक्षा प्रवासी संघटनांनी व्यक्त केली आहे. लोकल प्रवाशांचा दैनंदिन प्रवास सुरक्षित, वेळेत आणि सुलभ व्हावा, यासाठी संघटना व प्रशासन यांचा समन्वय पुढेही सुरू राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

सन २०१० पासून कसारा मार्गावर एक हि लोकल ट्रेन वाढविली नसल्याने निदान आता तरी जर ठाणे किंवा कल्याण येथून कसारासाठी लोकल ट्रेन वाढविणे शक्य नसेल तर टिटवाळा ते कसारा लोकल ट्रेन सुरू करा आणि कसारा येथे थांबा असलेल्या व कोरोना कालावधीत बंद केलेल्या चार मेल एक्सप्रेस यांना कसारा येथे अधिकृत थांबा दिल्यास रोजच्या गर्दीतील दहा टक्के गर्दी कमी होईल यावर चर्चा केली. पुढील काही महिन्यात रेल्वे प्रवाशांचा प्रवास सुरळीत होणार आहे.